## नि.दि.मु. क्र. ९६/२०१९ मधील आय.ए. नं. १/२०२० (निशाणी १९) वरील आदेश

प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादी क्र. १ ने त्याच्या विरुध्द झालेला दावा विनाकैफियत व विनाम्हणणे चालविण्याचा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादी क्र. १ चे असे म्हणणे आहे की तो वयोवृध्द असून त्याला ह्दय विकाराचा व उच्च रक्तदाबाचा आजार आहे. त्यामुळे त्याला उपचारासाठी केईएम हॉस्पीटलमध्ये मुंबईला जावे लागते. त्यामुळे दाव्यासंदर्भात आवश्यक ती कागदपत्रे त्याला गोळा करणे शक्य झाले नाही. तसेच कोरोना महामारीमुळे संपूर्ण भारतभर लॉकडाऊन असल्याने देखील ते न्यायालयात उपस्थित राहून कैफियत व म्हणणे देवू शकलेले नाहीत. त्यामुळे त्याच्या विरुध्द विनाकैफियत व विनाम्हणणे आदेश झालेला आहे. सदर आदेश न्यायाच्या पुर्ततेकरीता रद्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

**०३.** वादींनी त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास तीव्र हरकत घेतलेली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की अर्ज खोटा आहे. प्रतिवादी क्र. १ हा आजारी असल्याचा कोणताही पुरावा दिलेला नाही. सबब, अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**०४.** दोन्ही बाजूच्या विधीज्ञांच्या युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

**०५.** अभिलेखाचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. १ विरुध्द दावा विनाकैफियत व विनाम्हणणे चालविण्याचा आदेश दि. ०३/०३/२०२० रोजी पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र. १ ला दाव्याच्या समन्सची बजावणी दि. ०३/१२/२०१९

रोजी झालेली आहे. तेव्हापासून ३० दिवसांत अथवा जास्तीत जास्त ९० दिवसांच्या आत त्यांनी त्यांची कैफियत दाखल करणे अपेक्षीत होते. मात्र त्यांनी प्रस्तुत अर्ज दि. २९/१०/२०२० रोजी म्हणजेच समन्सच्या बजावणीनंतर जवळजवळ १० महिन्यांच्या विलंबाने दाखल केलेला आहे. सदर विलंब हा तो वयोवृध्द असून त्याला ह्दय विकाराचा व उच्च रक्तदाबाचा आजार असल्याने त्याला उपचारासाठी केईएम हॉस्पीटलमध्ये मुंबईला जावे लागते. त्यामुळे दाव्यासंदर्भात आवश्यक ती कागदपत्रे त्याला गोळा करणे शक्य झाले नसल्याने व कोरोना महामारीमुळे संपूर्ण भारतभर लॉकडाऊन असल्याने ते न्यायालयात उपस्थित राहून कैफियत व म्हणणे देऊ न शकल्यामुळे झाल्याचे प्रतिवादी क्र. १ चे म्हणणे आहे. त्याचे सदरचे कथन हे त्याने शपथेवर सांगितले आहे. नैसर्गिक न्यायतत्त्वाच्या आधारे दोन्ही बाजूंना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब योग्य तो खर्च आकारुन माफ करता येईल. त्यामुळे दाव्याचे स्वरुप पाहता व दाव्यामध्ये दोन्ही बाजूंच्या हक्काबाबतचा निर्णय होणार असल्याने प्रतिवादी क्र. १ ला त्याचे म्हणणे व कैफियत दाखल करण्याची परवानगी देणे उचित होईल असे मला वाटते. कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेल्या उशिराबाबत त्याचेवर रक्कम रुपये २००/– खर्च आकारणे योग्य राहील. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत अर्ज वादीस रक्कम रुपये २००/– चा खर्च पुढील तारखेपर्यत देण्याच्या पुर्व अटीवर मंजूर करण्यात येतो.

प्रतिवादी क्र. १ विरुध्द झालेला दि. ०३/०३/२०२० रोजीचा विनाकैफियत व विनाम्हणणे आदेश रद्द करण्यात येतो व त्याची कैफियत व म्हणणे स्वीकारण्यात येते.

Digitally signed by Bhanupratap Basantsingh Chouhan
Date: 2021.02.20 16:34:05 +0530

दि. २०/०२/२०२१ भानुप्रताप ब. चौहान
मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

“CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT.”

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER